| | |
|---|---|
| MHPU090029612024 | कौ.हिं.म.सं.का.क्र.१०१/२०२४<br>श्रुती पंचाक्षरे<br>वि.<br>सचिनकुमार पंचाक्षरे व इतर |

गैरअर्जदार क्र.१ तर्फे दि.०९.०७.२०२५ रोजी दाखल 'म्हणणे नाही' चा आदेश रद्द करणेकरीता दाखल केलेल्या अर्जावरील आदेश

सदरचा अर्ज गैरअर्जदार क्र.१ यांनी दि.२८.०४.२०२५ रोजी त्यांच्या विरुध्द झालेला "म्हणणे नाही" चा आदेश रद्द करणेकामी दाखल केलेला आहे. गैरअर्जदार यांनी असे कथन केलेले आहे की, सदर प्रकरणात गैरअर्जदार यांना अॅक्सेस न मिळाल्याकारणाने त्यांना मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. सबब, त्यांचेविरुद्ध 'म्हणणे नाही' असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. गैरअर्जदार यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल न झाल्यास गैरअर्जदार यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, गैरअर्जदार यांचे विरुद्ध झालेला "म्हणणे नाही" चा आदेश रद्द होउन त्यांचे म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

०२. सदर अर्जावर अर्जदार यांनी आपले म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, गैरअर्जदार यांना पुरेशी संधी देउनही ते मुदतीत म्हणणे दाखल न केल्याने त्यांचेविरुद्ध दि.२८.०४.२०२५ रोजी "म्हणणे नाही" असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अन्यथा त्यांचेवर जास्तीत जास्त दंड लावण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

०३. दोन्ही पक्षाचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा अर्ज अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १८, १९, २० व २२ प्रमाणे दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात गैरअर्जदार यांना म्हणणे दाखल करण्यास पुरेशी संधी देउन गैरअर्जदार हे मुदतीत म्हणणे दाखल न केल्याकारणाने सदर प्रकरणात दि.२८.०४.२०२५ रोजी गैरअर्जदार यांचेविरुद्ध "म्हणणे नाही" असा आदेश पारीत करण्यात आल्याचे दिसून येत आहे. गैरअर्जदार यांनी केलेली कथने ही संयुक्तीक नाहीत परंतु नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता गैरअर्जदार यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेणे आवश्यक आहे परंतु त्यांना झालेल्या विलंबापोटी त्यांच्यावर खर्च लादणे आवश्यक आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

गैरअर्जदार क्र.१ यांनी रु.५००/- (अक्षरी- पाचशे रुपये मात्र) अर्जदार हिस खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by
ANNAPURNA ISHWARA
AWATI
Date: 2026.04.15 18:03:19
+0530

**(**श्रीमती अ**.** ई**.** आवटी**)**
सह, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर
तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(कोर्ट क्र.५) पिंपरी, पुणे.

दिनांकः- १५.०४.२०२६

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Smt. S. A. Mulla (Grade - 3) |
| Court | : | Smt. A. I. Awati<br>**5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C, Pimpri, Pune.** |
| Date | : | 15.04.2026 |
| Order signed by the presiding officer on | : | 15.04.2026 |
| Order uploaded on | : | 15.04.2026 |
| Order Digitally signed on | : | 15.04.2026 |